| CNRNo.MHWR040007602020 | नोंदणी दिनांक | – | ०३/१०/२०२० |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | ०५/१०/२०२० |
| | निकाल दिनांक | – | ११/०३/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०५ ०५ ०६ |

**निशाणी क्र.०९**

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

| |
|---|
| **सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**<br>**ता. सेलु, जि. वर्धा**<br>**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**<br>न्यायनिर्णय घोषीत दिनांक ११/०३/२०२६<br>**(नियमित फौजदारी खटला क्र.१४७/२०२०)** |
| गुन्हा नोंद क्र.२५७/२०२०, पोलीस स्टेशन सेलू, ता.सेलू, जि.वर्धा |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सेलू |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **आरोपी** | १. | **प्रमोद उर्फ नमोद गुलाबराव पानबुडे,**<br>वय – ३३ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>राहणार – वार्ड क्र.१, घोराड, ता. सेलु, जि. वर्धा. |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ** | | श्री. आर.आर.पाटील |

**भाग – ब**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १५/०६/२०२० |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १५/०६/२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ०५/१०/२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २३/१०/२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २३/१०/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमोद उर्फ नमोद गुलाबराव पानबुडे | १६/०६/२०२० | १७/०६/२०२० | भा.दं.वि. ५०९ व ५०६ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

### (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

### सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.

अ. अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शुभांगी चंद्रकांत लिखार | फिर्यादी | ०५ |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार –**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**न्यायालयीन साक्षीदार –**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.०६ | फिर्यादीची तोंडी रिपोर्टवरील सहीला |
| २. | निशाणी क्र.०७ | फिर्यादीची छापील प्रथम खबरी अहवालावरील सहीला |
| ३. | निशाणी क्र.०८ | घटनास्थळ पंचनामा |

ड. भौतीक वस्तु -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | --- | ---- |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक : ११/०३/२०२६)

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ५०९ व ५०६ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. दि.१५/०६/२०२० रोजी सायंकाळी ०६.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी ही तिच्या घरामध्ये काम करीत असतांना तिचे घराशेजारी राहणारा आरोपी नमोद पानबुडे हा फिर्यादीला शिवीगाळ करीत होता. तेव्हा फिर्यादीने आरोपीला, “माझे घरासमोर येवुन अश्लील शिवीगाळ का करतो”

असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला,"बारीक गांडीचे, लोकांना घरात घालुन हेपाचा धंदा करते, हेपाचा धंदा करुन घर बांधले, तुझा नवरा तुझी भाड खाते तु माझे कडे ये तुला हेपतो" अश्या अश्लील शिवीगाळ केली व घरात घुसुन मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे तोंडी रिपोर्ट दिली. सदरची तक्रार पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.२५७/२०२० भारतीय दंड विधानाचे कलम ५०९ व ५०६ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. वामन घोडे यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. आरोपीला अटक करुन अटक फार्म तयार केले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चीत करुन त्यातील मजकूर आरोपीला वाचून दाखविला व त्याला मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपीने तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपीविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत कोणताही मजकूर अभिलेखावर आला नाही, त्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपीतर्फे विद्वान वकील आर.आर.पाटील यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक १५/०६/२०२० रोजी सायंकाळी ०६.३० वाजताच्या दरम्यान मौजा वार्ड क्र.१, घोराड, तालुका सेलू व जिल्हा वर्धा येथे आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याचे उद्देशाने फिर्यादी ही स्त्री आहे हे जाणून कोणताही शब्द उच्चारला, कोणताही आवाज केला किंवा हावभाव केला, किंवा कोणताही वस्तू दाखवली, असा हेतू होता की असा शब्द किंवा आवाज अशा महिलेला ऐकू यावा किंवा असा हावभाव किंवा वस्तू दिसावी, किंवा अशा महिलेच्या गोपनीयतेत घुसखोरी केली आणि त्याद्वारे तिच्या विनयशीलतेचा अपमान केला, म्हणून आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०९ अन्वये गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, म्हणून आरोपीने भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त. |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द वर नमुद गुन्हे सिध्द करण्यासाठी फक्त एक साक्षीदार तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपीवरील

दोषारोपीत गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ नामे शुभांगी चंद्रकांत लिखार (फिर्यादी) हिला निशाणी क्र.०५ वर तपासले आहे.

७. अभियोगपक्षाने आरोपीवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याचे उद्देशाने फिर्यादी ही स्त्री आहे हे जाणून कोणताही शब्द उच्चारला, कोणताही आवाज केला किंवा हावभाव केला, किंवा कोणताही वस्तू दाखवली, असा हेतू होता की असा शब्द किंवा आवाज अशा महिलेला ऐकू यावा किंवा असा हावभाव किंवा वस्तू दिसावी, किंवा अशा महिलेच्या गोपनीयतेत घुसखोरी केली आणि त्याद्वारे तिच्या विनयशीलतेचा अपमान केला तसेच आरोपीने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

<u>मुद्दे क्र.१ व २ करीता :</u>

८. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ शुभांगी चंद्रकांत लिखार (फिर्यादी) हिला निशाणी क्र.०५ वर नोंदविण्यात आली आहे. साक्षीदाराने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ती आरोपीला ओळखते. ते तिच्या घराशेजारी राहतात. घटना सन २०२० मध्ये संध्याकाळी ०५.३० वाजताचे सुमारास तिच्या घरासमोर घडली होती. त्यावेळी तिचे आरोपीसोबत तोंडातोंडी वाद झाला होता. याव्यतिरिक्त काहीही घडले नाही. तिने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. तिला सदरची तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आली, त्यावर तिची सही असुन त्यातील

मजकूराबाबत तिला काहीही माहित नसल्याचे कथन केले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी तिचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले आहे की, दि.१५/०६/२०२० रोजी संध्याकाळी ०६.३० वाजताच्या सुमारास ती व तिचे सासु सासरे घरी हजर होते. त्यावेळी आरोपीने तिला,"बारीक गांडीचे लोकांना घरात घालुन हेपाचा धंदा करते, हेपाचे धंदा करुन घर बांधले व तुझा नवरा तुझी भाड खाते, तु माझ्या कडे ये मी तुला हेपतो" अशी अर्वाच्य शिवीगाळ केली होती व जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे तिने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशनला जाउन तक्रार दिली होती. पोलीसांनी तिचा जबाब तिच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. अभियोग पक्षास साक्षीदाराचा उलटतपासात आरोपीविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपीवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

९. उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याचे उद्देशाने फिर्यादी ही स्त्री आहे हे जाणून कोणताही शब्द उच्चारला, कोणताही आवाज केला किंवा हावभाव केला, किंवा कोणताही वस्तू दाखवली, असा हेतू होता की असा शब्द किंवा आवाज अशा महिलेला ऐकू यावा किंवा असा हावभाव किंवा वस्तू दिसावी, किंवा अशा महिलेच्या गोपनीयतेत घुसखोरी केली आणि त्याद्वारे तिच्या

विनयशीलतेचा अपमान केला तसेच आरोपीने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली असे फिर्यादीने सांगितले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे कोणती घटना घडली होती यावर विश्वास बसत नाही. जरी प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळ पंचनामा आरोपीने मान्य केले असले तरी सदरचा गुन्हा सिध्द होण्याकरिता फिर्यादीने साक्ष दिलेली नाही. त्यामुळे घटना घडली होती किंवा नाही असे ठामपणे म्हणता येणार नाही. अभियोगपक्षाने तपासी अधिकारी व इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भा.दं.वि.चे कलम ५०९ व ५०६ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ व २ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत :**

**१०.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **प्रमोद उर्फ नमोद गुलाबराव पानबुडे** याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रिया

संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र.२५७/२०२० भारतीय दंड विधानाचे कलम ५०९ व ५०६ पोलीस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.03.12 10:29:32 +0530

(एस.आर.सातभाई)

**दिनांक** : ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)